





# कॉस्मो फाऊंडेशन

सामाजिक उत्तरदायीत्व

## कॉस्मो फिल्म्स लि.

त्रैमासिक क्र. १६

**जानेवारी ते मार्च २०२१**

## ब्लंकेट वितरण कार्यक्रम- पुरी

कॉस्मो फाऊंडेशन शिक्षणाबरोबर सामाजिक कार्यामध्ये नेहमीच पुढाकार घेत असते. गरजू व ग्रामीण भागातील विद्यार्थी यांना सामाजिक, नैतिकमुल्यांचा तसेच जीवनकौशल्याविषयी आणि काळजी गरज असलेले तंत्रज्ञान चे शिक्षण देत आहे. सामाजिक कार्याचा एक भाग समजून, तसेच खूप मोठ्या प्रमाणात थंडीने कहर केला होता व औरंगाबाद जिल्ह्यात कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे नागरिकांची कि बिकट परिस्थिती निर्माण झाली होती. हि गरजू नागरिकांची एक गरज समजून कॉस्मो फाऊंडेशन कडून १५० ब्लंकेट चे वितरण पुरी या गावातील गरजु व्यक्तींना करण्यात आले. या मध्ये अपंग व वंचित घटकातील नागरिक, अंध, विधवा महिला, गरजू विद्यार्थी वयस्कर बेघर व्यक्ती अशे एकूण १५० गरजूंना ब्लंकेट चे वितरण करण्यात आले आहे. ब्लंकेट वितरण केल्यावर सर्व लाभार्थींनी कॉस्मो फाऊंडेशन चे आभार व्यक्त केलेआणि त्यांचा चेहऱ्यावर एका प्रकारचे हास्य उमटले व कॉस्मो फाऊंडेशन ने दिलेल्या ब्लंकेटमुळे आम्हाला नक्कीच थंडी पासून संरक्षण करण्यास मदत होईल असे ते म्हणाले.

सादरील कार्यक्रमासाठी कॉस्मो फिल्म्स कंपनीचे इंजिनीअर प्लांट हेड श्री.महेश भाले सर, श्री.मधुकर मोरे, श्रीमती. मुमताज पटेल सरपंच ग्रामपंचायत पुरी, श्री.जोशी सर तसेच गावातील नागरिक व लाभार्थी उपस्तीत होते. याप्रसंगी श्री.भाले यांनी आपले मनोगत व्यक्त करून सर्व लाभार्थी यांना ब्लंकेट चे वितरण केले व ते म्हणाले कि नक्कीच कॉस्मो फाऊंडेशन ने खूप महाव्ताचे व मोलाचे कार्य केले आहे नक्कीच सर्व गरजूंना याचा थंडी पासून संरक्षण करण्यसाठी उपयोगी ठरेल व सर्व पाहुण्यांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि श्रीमती.हेमलता राजपूत यांनी कार्यक्रमाचा समारोप केला.








## मराठी भाषा गौरव दिवस




मराठी साहित्याचा मानदंड कुसुमाग्रजयांचा जन्मदिन २७ फेब्रुवारी हा “मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. विद्यार्थ्यामध्ये आपल्या मातृभाषा बद्दल अभिमान वाटला पाहिजे आणि आदर केला पाहिजे या उद्देश समोर ठेऊन कॉस्मो फाऊंडेशन कडून नूतन कन्या विद्यालय वाळूज येथे  एक छोटेसे नाव्य” अति तेथे माती” सादर करण्यात आले होते. या मध्ये एकूण ८ विद्यार्थिनी सहभाग घेतला होता. या नाटिकेमध्ये मराठी भाषा चे कसा आदर केला पाहिजे आणि कशा प्रकारे आपल्या भाषेचा आदर-सम्मान केला पाहिजे हा संदेश देण्यात आला. यामध्ये खूप उत्साहीपणे शिक्षक आणि विद्यार्थी यांनी प्रतिसाद दिला.


## कॉस्मो फिल्म्स लि.कर्मचारी  यांना कॉस्मो फाउंडेशन  ची ओळख

कॉस्मो फिल्म्स लिमिटेड कंपनी मधील नवीन रुजू होणारे कर्मचारी तसेच अधिकारी यांना कॉस्मो फाउंडेशन चे काम कशाप्रकारे सुरु आहे, या विषयी माहिती व्हावी आणि त्यांचा कडून मुलांना तंत्रज्ञान क्षेत्रात जाण्याचे  मार्गदर्शन मिळावे म्हणून कॉस्मो फाउंडेशन ची सर्व माहिती त्यांना दिली जाते. जानेवारी महिन्यात दहा कर्मचारी  यांनी जि.प.शाळा आसेगाव येथे भेट दिली व विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या  सोबत संवाद साधला. तसेच कॉस्मो फाउंडेशन मधील संगणक प्रशिक्षण व ज्ञान विहार केंद्र या मध्ये अजून काय शिकवता येईल या विषयी चर्चा केली व गंगापूर तालुक्यात शाळा मध्ये शिक्षणाबरोबर  स्वच्छता, सन उत्सव, उदयन शालिनी व इतर सुरु असलेले सामाजिक कार्य  या संबधी माहिती दिली.



## फेअर प्ले मधील सहभागी विद्यार्थ्यांना चित्रकला कार्यशाळा

फेअर प्ले या उच्चस्तरीय चित्रकला स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना चित्र कशा प्रकारे काढावे, विषय कसा समजून घ्यावे, साहित्य काय व कशा प्रकारे वापरले पाहिजे, अशा विविध विषयावर श्री,सचिन दराडे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत एकूण ५० विद्यार्थी यांनी सहभाग घेतला होता. कार्यशाळा झाल्यावर जेव्हा विद्यार्थ्यांची स्पर्धा झाली त्या मध्ये विद्यार्थ्यांनी खूप मनोभावी व विषयासोबत संबध असलेले चित्र काढले. या कार्यशाळेचा सर्व विद्यार्थी तसेच कॉस्मो शिक्षकांना खूप चांगल्या प्रकारे मार्गदर्शन मिळाले.



## अरुणा किशोर फाऊंडेशन कडून आरोग्य कवच चे वितरण

अरुणा किशोर फाउंडेशन, ए.के फाउंडेशन म्हणून ओळखले जाणारे एक गैर-सरकारी आहे. वडोदरा - गुजरात येथे आहे आणि संपूर्ण भारत देशात सक्रियपणे कार्यरत आहे. जनजागृती, शिक्षण आणि प्रशिक्षण याद्वारे आदिवासींचा समुदाय, ग्रामीण भाग आणि शहरी झोपडपट्ट्यांचा विकास हा या संस्थेचा प्रमुख उद्देश आहे.

कोरोना या आजाराच्या प्रादुर्भावामुळे आदिवासी समुदायातील तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे आरोग्याचे संरक्षण व्हावे म्हणून औरंगाबाद मधील कॉस्मो फाऊंडेशन मार्फत १५० आरोग्य कवच चे वितरण करण्यात आले. यामध्ये सॅनीटायजर, हात मोजे, मास्क, साबण, इत्यादी साहित्य असलेल्या कीट चे वितरण करण्यात आले. विद्यार्थांना नक्कीच याचा खूप मोठ्या प्रमाणात लाभ होईल. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून ए.के फाउंडेशन ग्रामीण भागातील समूहामध्ये जावून शिक्षण देण्याचे कार्य खूप चांगल्या प्रकारे करत आहे.







## कॉस्मो शिक्षकांना चेअरमन पुरस्कार




मागील वर्षापासून आपण कोरोना या महामारीच्या आजारासोबत लढत आहोत. त्याचाच एक भाग म्हणून शाळा बंद असल्या कारणामुळे विद्यार्थ्यांचे खूप मोठे शैक्षिणिक नुकसान होत आहे असे दिसून आले त्याच अनुषंगाने कॉस्मो फाऊंडेशन कडून विविध उपक्रम ऑनलाइन-इंटरनेट च्या माध्यमातून राबविण्यात आले. त्यामध्ये डिजीशाळा ग्रुप, झूम वर्ग, ऑनलाइन सन उत्सव असे विविध उपक्रम राबविले. यामध्ये उत्कृष्ट कामगिरी ज्या शिक्षकांनी केली त्यांना कॉस्मो फिल्म्स कंपनीचे चेअरमन मा.श्री.अशोकजी जयपुरिया यांचा नावाचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. या मध्ये २ शिक्षक औरंगाबाद आणि ६ कर्जन असे एकूण पुरस्कार आठ शिक्षकांना पुरस्कार देण्यात आल. या मागील उद्देश असा आहे कि, सर्व शिक्षकांन मध्ये नवीन उपक्रम करण्याची प्रेरणा मिळावी व सामाजिक क्षेत्रात एक ओळख निर्माण व्हावी.

## जागतिक महिला दिवस- महिलांचे प्रतिबिंब

जागतिक महिला हा दिवस अस्तित्त्व, ओळख, संघर्ष, यश, अपारंपरिक भूमिका आणि कुटुंब आणि समाजातील महिलांचे योगदान साजरे करण्यासाठी चिन्हांकित आहे. महिलांसाठी प्रेम, आदर, समान हक्क साजरा करण्यासाठी आम्ही महिला दिन प्रत्येक वर्षी विविध प्रकारे साजरा करता असतो. कॉस्मो फाऊंडेशन मध्ये आम्ही मुलींचे शिक्षण आणि महिला सक्षमीकरणास प्रोत्साहन देतो, महिलांना शिक्षक आणि परिवर्तनाचे उत्प्रेरक म्हणून प्रोत्साहित करतो.

कॉस्मो फाऊंडेशन त्याच अनुषंगाने या वर्षी ऑनलाईन झूम च्या माध्यमातून महिला दिवस साजरा करण्यात आला. कॉस्मो फाऊंडेशनने महिलांचे प्रतिबिंब - अस्तित्व आणि ओळख यावर वेबिनार आयोजित केले. या वेबिनारमध्ये करजन आणि औरंगाबाद ग्रामीण भागातून 70 सदस्यांनी सहभाग नोंदवला. प्रशिक्षक कु.निमिषा पारीख यांनी ही एक अतिशय अंतर्ज्ञानी सहभाग घेणारी प्रक्रिया होती. ‘एक महिला म्हणून त्यांची प्रतिमा कशी दिसते’ आणि ‘आजूबाजूच्या स्त्रियांची प्रतिमा’. प्रत्येक सहभागीने त्यांची प्रतिमा ओळखली आणि स्वत: शी तुलना केल्याबद्दल अनन्य प्रतिसाद मिळाला. आकाश, सूर्य, रंग, वृक्ष, लहान मुलाचे स्मितहास्य, पुस्तके, निसर्ग, नदी, बोट, वारा इ. काही महिला व पुरुष यांचे प्रतिबिंबित प्रतिबिंब असे या व्हिडिओमध्ये सादर केले.

महिला दिनानिमित्त विविध विषय तयार करून विद्यार्थ्यानं साठी अभ्यास देण्यात आला. त्या मध्ये विद्यार्थ्यांनी सुभेच्छा पत्र तयार करून आपल्या आई, बहिण, घरातील मोठी महिला व्यक्ती यांना महिला दिनाच्या सुभेच्छा दिल्या. कॉस्मो शिक्षकांनी गावातील महिला, अंगणवाडी कर्मचारी, आरोग्य कर्मचारी, आशा सेविका, प्रतिष्टीत महिला नागरिक यांनाहि सुभेच्छा देण्यात आल्या. आपल्या आवडत्या महिला शिक्षक, आपणा ज्या महिलाना आपला आदर्श मानतो यांच्या विषयी माहिती लिहून डिजीशाळा या ग्रुप च्या माध्यमातून अभ्यास देण्यात आल. सर्वांनी खूप चांगल्या प्रकारे या उपक्रमास प्रतिसाद दिला.









## कॉस्मो डिजी पाठशाला

संपूर्ण जग हे कोरोना या जागतिक महामारी मुळे त्रस्त झाले होते. त्या मुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाची एक समस्या निर्माण झाली होती. त्यामुळे विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थी हे शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून. कॉस्मो फाऊंडेशन कडून कॉस्मो डिजीटल शाळा हा उपक्रम सुरु करण्यात आला होता. या उपक्रमास खूप चांगला प्रतिसाद मिळू लागला आहे. या उपक्रमातून स्वच्छता आणि जीवन कौशल्य, डिजिटल साक्षरता, प्रेरानादाई व्हिडीओ, विचार शक्ती, गणित कोढी आणि जागृतता, करिअर मार्गदर्शन इंग्रजी, विज्ञान आणि तंत्रज्ञान आणि सामान्य ज्ञान. असे विविध विषय या उपक्रमातून शिकवले जाऊ लागले. अभिप्राय सहकार्य मिळत आहे. या उपक्रमात ९०० विद्यार्थी सहभागी होऊन शिकत आहे.




## सन उत्सव

कॉस्मो फाऊंडेशन सर्व प्रकारचे सन उत्सव विद्यार्थ्यान सोबत साजरे करत असते, परंतु वर्षी कोरोना या आजाराच्या पार्श्वभूमीवर डिजीटल स्वरुपात जागतिक हिंदी दिवस, सावित्रीबाई फुले जयंती, २६ जानेवारी, मकर संक्रात, छ.शिवाजीमहाराज जयंती, दिवस असे विविध प्रकारचे सन उत्सव विद्यार्थ्यंना डिजीटल स्वरुपात प्रश्न, कलाकृती, वेशभूषा, भाषण, स्पर्धा, च्या माध्यमातून साजरे करण्यात आले त्या मध्ये विद्यार्थांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. या मध्ये एकूण ४५० ते ५०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

सन उत्सव साजरे करण्याचायाचा उद्देश असा आहे कि विद्यार्थ्यांना या मधून नवनवीन गोष्टी शिकायला मिळाव्या व त्यांनी या सणाविषयी माहिती मिळावी आणि त्यांनी सानामधून जे काही शिक्षक मिळत आहे ते त्यांच्या वयक्तिक जीवनात त्याचा त्यांना लाभ मिळावा म्हणून विविध प्रकारे कॉस्मो फाऊंडेशन असे कार्यक्रम राबविले जातात.



## शासनाच्या नियमावलीनुसार शाळा सुरु

शासनाच्या नियमानुसार जेव्हा शाळा सुरु झाल्या तेव्हा कॉस्मो फाऊंडेशन कडून शाळेतील विद्यार्थ्यांना मास्क, स्वयंचलित सॅनीटायझर मशीन, थर्मल गण आणि ऑक्सिमीटर देण्यात आले होते जेणेकरून विद्यार्थी सुरक्षित राहील व त्याचा वापर करेल. आणि कॉस्मो फाउंडेशन सुरु असलेले उपक्रम हि सुरु करण्यात आले होते यामध्ये कॉस्मो ज्ञान विहार केंद्र आणि संगणक साक्षरता कार्यक्रम हे दोन कार्यक्रम शासनाच्या नियमात बांधील राहून सुरु केले आणि याला खूप चांगल प्रतिसाद हि मिळाला होता. विद्यार्थीही दिलेल्या सर्व साहित्याच्या वापर करत होत आणि नियमित शाळेत येत आहे.






## पालक आणि विद्यार्थी यांच्या साठी




पालक आणि विद्यार्थी मित्रहो आपणास माहिती आहे कि कोरोना या महामारीच्या प्रादुर्भावामुळे सर्व शाळा व विद्यालय बंद आहे. यामध्ये विद्यार्थ्यांचे खूप मोठ्या प्रमाणार शैक्षणिक नुकसान होत आहे. अशी परिस्थिती निर्माण झाली आहे कि ज्या विद्यार्थ्यांनी शाळा पहिली नाही आणि ते दुसर्या वर्गात उत्तीर्ण झाले. यामुळे विद्यार्थ्यांचे खूप मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे तरी आपणास विनंती आहे कि कॉस्मो फाऊंडेशन कडून तसेच शाळेकडून जो काही अभ्यास दिला जात आहे तो अभ्यास आपल्या मुलाकडून करून घेवून जे शाळेचे आणि कॉस्मो फाऊंडेशन चे ग्रुप आहे त्या मध्ये पाठवला पाहिजे. जेणेकरून विद्यार्थी अभ्यासा सोबत सलग्न राहतील व ते अभ्यासापासून दूर जाणार नाही. आणि त्यांचे शैक्षणिक नुकसानही होणार नाही.

**होळीच्या व मराठी नवीन वर्षाच्या सर्वांना हार्दिक सुभेच्छा..!**

सर्व स्नेही, पालक व विद्यार्थी मीत्रहो आपणास जागतिक साक्षरता दिनाच्या खूप सुभेच्छा. यावर्षी आपण कोरोना या आजाराच्या प्रादुर्भावामुळे सर्वांनी शासनाच्या नियमाचे पालन करू व होईल तेव्हडे घरी राहून शिक्षण घेवू.

**अधिक माहितीसाठी**

www.cosmofilms.com/CSR Cosmo Foundation@Facebook/cosmo fFoundation@Instagram
We welcome your feedbacks & Suggestion
Hemlatta.rajput@cosmofoundation.in